कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांच्या सुधारित पदस्थापनेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन आदेश क्रमांकः एलटीएस-१११५/(४९२/२०१५)/आ (वर्ग-१)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
तारीख: १९ जानेवारी, २०१६.

वाचा:- १) जलसंपदा विभाग, शासन आदेश क्र.एलटीएस-१११५/(२४७ /२०१५)/आ.(वर्ग-१), दि.२३.०६.२०१५.
२) मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिरण, खंडपीठ नागपूर यांचे दि.२७.१०.२०१५ चे अंतिम आदेश.
३) जलसंपदा विभाग, शासन आदेश क्र.एसएलएस-१११४/(५१६/२०१४)/आ.(वर्ग-१)..(३), दि.०५.११.२०१५.

शासन आदेश :-

श्री.राहुल सोमनाथ मेश्राम यांची संदर्भीय क्र.१ येथील आदेशान्वये बदलीने नियुक्ती **उप अधीक्षक अभियंता, दक्षिण कोकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, ओरोस, जि.सिंधुदूर्ग** या पदावर करण्यात आली होती. तसेच, श्री.रविंद्र रामदास बानुबाकडे यांची संदर्भीय क्र.३ येथील आदेशान्वये पदोन्नतीने नियुक्ती **सहायक मुख्य अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प, नागपूर** या पदावर करण्यात आली होती.

२. आता, महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार व सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने तसेच, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ नागपूर यांच्या संदर्भीय क्र.२ येथील आदेशान्वये श्री.रा.सो.मेश्राम यांच्या पदस्थापनेत अंशत: बदल करुन बदली अधिनियमातील कलम ४(४) व ४(५) नुसार त्यांची सुधारित पदस्थापना **कार्यकारी अभियंता, संकल्पचित्र पथक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर** या रिक्त पदी त्यांच्या विनंतीनुसार करण्यात येत आहे.

तसेच, श्री.र.रा.बानुबाकडे यांच्या पदस्थापनेत अंशत: बदल करुन बदली अधिनियमातील कलम ४(४) व ४(५) नुसार त्यांची सुधारित पदस्थापना **कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, नागपूर** या श्री.रा.सो.मेश्राम यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदी त्यांच्या विनंतीनुसार करण्यात येत आहे.

३. संबंधीत अधिकाऱ्यांना नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणि ते नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत शासनास doesttclass1.wrd@maharashtra.gov.in या ई-मेल संकेतस्थळावर त्वरित कळवावे.

४. संबंधीत अधिकाऱ्यांना शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच म.ना.से. (रजा) नियम, १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास, ते संबंधीत अधिकाऱ्यास मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत. मूळ कार्यालयाकडे बदली झालेल्या अधिकाऱ्याचे रजेचे अर्ज पाठविल्यास सदर अर्जांची दखल घेण्यात येणार नाही.

५. सदरहू बदली आदेशानुसार तात्काळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचे विरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१६०११९१५३८५८७४२७** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijay Karbhari Chaudhari

Digitally signed by Vijay Karbhari Chaudhari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Vijay Karbhari Chaudhari
Date: 2016.01.19 16:10:41 +05'30'

(वि.का.चौधरी)
शासनाचे अवर सचिव

प्रत,

१) प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)/ सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) सर्व कार्यकारी संचालक / महासंचालक, जलसंपदा विभाग.
४) सर्व मुख्य अभियंता व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई.
५) सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
६) मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण), पुणे.

७) सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
८) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता), १-मुंबई / २-नागपूर.
९) खाजगी सचिव, मा. मंत्री (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई.
१०) खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री (जलसंपदा),मंत्रालय, मुंबई.
११) संबंधीत अधिकारी.
१२) संबंधीत जिल्हा कोषागार अधिकारी.
१३) सह सचिव (सेवा) / अवर सचिव (सेवा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) सर्व कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई .
१५) कार्यासन आ (वर्ग-१), संग्रहार्थ.